# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र. ७२६/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०४/११/२०१६

**१) आरोपीतांनी संगनमत करुन मारहान करुन तिला आत्महत्या करण्यास प्रवृत्त केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक २१/१०/२०१६ रोजी १२.०० ते २३.०० वा. दर. यातील दोन्ही आरोपीतांनी संगनमत करुन फिर्यादीची मृतक मुलगी सौ. वनिता रत्नघोष गोंडाणे वय ३२ वर्ष, रा. मासळ हयात असतांना दुसरे लग्न करुन मृतकला सोडचिठठी देण्याचे व पळुन जाण्याची धमकी देवुन मृतकला मारहान करुन तीला आत्महत्या करण्यास प्रवृत्त केल्याने फिर्यादी श्रीमती रत्नमाला उध्दव तुरकाने वय ६० वर्ष, रा. कुरुड जिल्हा गडचिरोली यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम ३०६,४९४,५०६,३४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. लाखडे पो.स्टे. लाखांदुर हे करीत आहेत.

**२) जिल्हातुन हद्द पारीचे आदेश असतांना सुध्दा परवानगी न घेता शहरात फिरतांना मिळुन आल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक ०३/११/२०१६ रोजी १५.१५ वा. दर. यातील आरोपी यास मा. कोर्ट विद्यमान श्रीमती शिल्पा सोनाले उपविभागीय दंडाधिकारी यांचे आदेशान्वये दोन वर्षा करीता गोंदीया, भंडारा, नागपुर जिल्हातुन हद्द पारीचे आदेश असतांना शासनाची कोणतीही पुर्व परवानगी न घेता तुमसर शहरात फिरतांनी मिळुन आल्याने पोस्टे स्टेशन तुमसर येथे कलम १४२ मपोका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. श्रीवास पो.स्टे. तुमसर हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**३) तलावाच्या पाण्यात बुडुन मुलीचा मृत्यु. :–**

दिंनाक. ०३/११/२०१६ रोजी १२.०० वा. पुर्वी. यातील फिर्यादी सुभाष तुळशीदास लांजेवार वय ३५ वर्ष, रा. जांभळी यांची पुतणी मृतक कु. खुशबु यादव लांजेवार वय १२ वर्ष, रा. जांभळी ही सकाळी ०९.०० वा. तिची आजी पुर्णबाई वामण लांजेवार तिचे सोबत माल गुजारी तलावा जवळील जंगलात काळया आणण्यास गेली होती. आजीने नातनीला काळया तोडुन घरी जाण्यास सांगीतले व ति काळया घेवुन निघाली दुपारी १२.०० वा. आजी काळया घेवुन घरी आली असता नातीन घरी न आल्याने तिचा शोध घेतला असता मालगुराजी तलावाच्या पाण्यात मृतकाचे प्रेत पाण्यात तरगतांना दिसुन आल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पो.स्टे. साकोली येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. डोंगरवार पो. स्टे. साकोली हे करीत आहेत

**४) मोटार वाहन कायद्याखाली कारवाई. :–**

दिनांक ०३/११/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायद्याखाली ६३ प्रकरणांची नोंद कण्यात आलेली असून त्यापैकी तिन सिटर वाहनांवरती ११ केसेस व ईतर वाहनांवरती ५० केसेस आणि अवैद्य प्रवासी ०२ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

(बी. आर. गाडे)
**प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)**
**भंडारा करीता**
**दुरध्वनी.क्र. ८८०५१०१११२**

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.